जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ०१ दिनांक - ०१/०१/२०२४**

मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मंगेश बाळासाहेब तांबे (टोळी प्रमुख) व त्याचे ०२ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

यातील फिर्यादी हे दिनांक १०/१२/२०२३ रोजी धायरकर वस्ती, मुंढवा, पुणे येथील हॉटेल मध्ये त्यांचे पत्नी सह जेवण करण्यासाठी गेले होते. जेवण करुन वॉशरुमला जात असतांना बाजुच्या टेबल वरील फिर्यादीचे ओळखीचा मंगेश तांबे हा त्याचा मित्र अक्षय गागडे व गोट्या पूर्ण नांव माहित नाही यांचेमध्ये हॉटेलचे बील देण्यावरून आपसांत वाद घालून शिवीगाळ सुरू असल्याने फिर्यादी यांनी शिवीगाळ करू नका याठिकाणी लेडीज जेवण करीत आहेत असे बोलले असता,त्याचा राग येऊन मंगेश तांबे याने टेबलावरील रिकामी बियरची बाटली फोडून,फिर्यादीस जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचे तोंडावर वार केला. त्यामध्ये फिर्यादीच्या डाव्या डोळ्याचे खाली गंभीर जखम होऊन दुखापत झाली. त्याबाबत फिर्यादी यांनी मुंढवा पोलीस ठाणेस फिर्याद दिल्याने **मुंढवा पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.३८८/२०२३ भादंवि कलम ३०७,३३६,३५२,५०४, ५०६,४२७,३४,क्रिमिनल लॉ अमेन्टमेन्ट ॲक्ट १९३२ चे कलम ३ व ७** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान सदरचा गुन्हा १)**मंगेश बाळासाहेब तांबे,वय २८ वर्षे,रा.खराडकर पार्क,खराडी,पुणे (टोळी प्रमुख) (पाहिजे आरोपी) २)अक्षय कुंदन गागडे वय-२४ वर्षे,रा.स.नं.९/१४, गायरान वस्ती,केशवनगर,मुंढवा,पुणे ३)कार्तिक भरत गुमाणे,वय-२० वर्षे,रा.स.नं.९/१४,गायरान वस्ती, केशवनगर,मुंढवा,पुणे (टोळी सदस्य)** यांनी केल्याचे निष्पन्न झालेने अ.क्र.२ व ३ यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

आरोपी मंगेश बाळासाहेब तांबे त्याने साथीदारासह बेकायदेशिर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटीत गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करुन किंवा हिंसक मार्गाचा अवलंब करुन स्वतःचे व स्वतःच्या टोळीचे वर्चस्व रहावे म्हणुन व अवैध मार्गाने आर्थिक फायदा व्हावा या करीता केलेला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मंगेश तांबे याने टोळीतील वेग-वेगळया साथीदारासह तसेच स्वतःजवळ बेकायदेशिर शस्त्र बाळगणे,दुखापत,बदल्याची भावना,गैर-कायदयाची मंडळी जमवणे, नुकसान करुन दहशत करणे, खंडणी स्वरुपात पैशाची मागणी अशा प्रकारची गंभीर स्वरुपाचे गुन्हे खडक, बंडगार्डन, मुंढवा अशा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात केलेले आहेत.

यातील नमुद आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी प्रस्तुत गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने नमुद गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधि.सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) चा अंतर्भाव करणेकामी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम २३(१)(अ) नुसार मान्यता मिळणेकरीता मुंढवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विष्णु ताम्हाणे यांनी पोलीस उपायुक्त,परिमंडळ-५,पुणे शहर,श्री.आर.राजा यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करुन मुंढवा पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ३८८/२०२३,भादंवि कलम ३०७, ३३६,३५२,५०४,५०६,४२७,३४,क्रिमिनल लॉ अमेन्टमेन्ट ॲक्ट १९३२ चे कलम ३ व ७ या गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधि.सन १९९९ चे कलम ३(१),(ii),३(२),३(४) चा अंतर्भाव करणे बाबत मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री, रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर,श्रीमती.अश्विनी राख ह्या करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे,(पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार),श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-५,पुणे शहर,श्री.आर. राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर,श्रीमती.अश्विनी राख त्यांचे मार्गर्शनाखाली मुंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विष्णू ताम्हाणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.सुनिता रोकडे, सहा.पोलीस निरीक्षक,राजु महानोर, पोलीस उपनिरीक्षक,सदाशिव गायकवाड, पोलीस अंमलदार,हेमंत झुरुंगे, दिपक कांबळे, रविंद्र देवढे, विजय माने यांनी कारवाई केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईन लक्ष देवुन,शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही १०७ वी कारवाई आहे.**